# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 05/09/2023 (मंगळवार) सकाळ

## बॅटरी चोरी

**पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत १० किमी अंतरावर मौजा सिंगोरी खदान येथे दिनांक २५/०८/२०२३ चे १२.०० वा. ते दिनांक ०३/०९/२०२३ चे १९.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— भैय्यालाल बच्चा सुर्यवंशी, वय ४८ वर्ष, रा. कालीमंदीर जवळ वार्ड क्र. ०४ झोपडपट्टी वलनी खदान ता. सावनेर याने त्याचा ट्रक क्र. एम. एच.— ३४/एम ४७११ हा सिंगोरी खदान येथे कोळसा भरणे करिता नंबर लावले असता यातील फिर्यादी याला त्याचा मित्र असलम रा. वलनी याने फोन करुन सांगीतले की, त्याच्या ट्रकच्या कॅबिनचे दार उघडे आहे. अशी मिळालेल्या माहीतीवरुन फिर्यादीने ट्रक जवळ येवुन पाहीले असता त्यांना त्यांच्या ट्रकच्या डाव्या बाजुचे कॅबिनचे दार उघडे दिसले असता त्यांनी कॅबीनचे आत जाउन पाहीले तर त्यांना ड्रायव्हर सिटच्या बाजुला असलेल्या बॉक्समध्ये पावर झोन कंपनीची काळे व केसरी रंगाची बॅटरी किंमती १००००/— रु. ची बॅटरी दिसुन आली नाही. कोणीतरी अज्ञात चोराने बॅटरी चोरुन नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार सुरेश धुर्वे मो. नं. ९९२२९३५८७८ हे करीत आहे.

## दुखापत

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत २० कि. मी. अंतरावरील गोवरी येथे दिनांक ०३/०९/२०२३ चे १८.०० वा. १८.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— दिलीप ईश्वर सिदीमेश्राम, रा. वय ३३ वर्ष रा. गोवरी हे दिनांक ०३/०९/२०२३ चे सायंकाळी ०६.०० वा. ते ०६.३० वा. दरम्यान कामावरून घरी परत येत असता फिर्यादी यांचा सावत्र भाऊ आरोपी क्र. १) जितेंद्र ईश्वर सिदीमेश्राम हा फिर्यादीकडे आला व म्हणाला तूझ्या पत्नीला सायवनीमध्ये कपडे वाळू घालू देवू नको असे सांगून सूदधा तिने आज दुपारी सायवनी मध्ये साडी वाळू घालली व माझ्या पत्नी सोबत झगडा भांडण केले या कारणावरून आरोपी नामे— १) जितेंद्र ईश्वर सिदीमेश्राम, २) लोकेश मागोजी सिदीमेश्राम ३) मांगोजी श्रीराम सिदीमेश्राम तिन्ही रा. गोवरी ता. मौदा यांनी फिर्यादीस हातबुक्क्यांनी मारहाण करून काठीने डोक्यावर उजव्या हाताच्या कोपरावर मारून जखमी केले व शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक प्रदिप ठाकरे ब. नं. २००८ मो. नं. ८८८८८०३८६२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर